ग्रं.नं.७० मराठी

महात्म्य

६९६।२३

3022

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ६९६।२३ (९५०)

ग्रंथ नाम शनी महात्म्य.

विषय माहात्म्य.

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

१८ माहात्म्य

# शनिमाहात्म्य

पोथी 2 प्रती.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

# ॥ अथ शनिमाहात्म्य प्रारंभ ॥

" Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(2)



Phule and the Yashwantrao

(2A)

श्रीगणेशायनमः ॥ ॥ ॐनमोजीगणनायका ॥ एकदंतावरदायका ॥ स्वरूप-
संपदाविनायका ॥ करींकृपामजवरी ॥ १ ॥ आतांनमूंब्रह्मकुमारी ॥ हंसा-
रूढवागीश्वरी ॥ वीणाशोभेदक्षिणकरों ॥ विजयमूर्तिसर्वदा ॥ २ ॥ नमन
माझेंगुरुवर्या ॥ सुखमूर्तिकरुणालया ॥ नमूंसंतश्रोतियांच्यापायां ॥ अभेद-
भेदाकरूनी ॥ ३ ॥ आतांनमूंश्रीपांडुरंगा ॥ यावेंतुवांकथेचियाप्रसंगा ॥ निर-
सूनिमाझियाभवसंगा ॥ करींकृपामजवरी ॥ ४ ॥ गुजराथभाषेचीकथा ॥
नवग्रहांचींतत्वता ॥ हीऐकतांएकचित्ता ॥ संकटव्यथानबाधिती ॥ ५ ॥
आतांउज्जनीनामनगरीं ॥ राजाविक्रमराज्यकरी ॥ तेथीलचरित्राचीपरी ॥
ऐकाचित्तदेऊनियां ॥ ६ ॥ कोणीएकेदिवशींप्रातःकाळीं ॥ बैसलीहोतीसभा-
मंडळी ॥ तेथेंमहापंडितत्याकाळीं ॥ लहानथोरबैसले ॥ ७ ॥ ऐशीसभाबैसली
घनदाट ॥ तेथेंचर्चानिघालीसुभट ॥ ह्मणतीनवग्रहांतकोणश्रेष्ठ ॥ सांगावें
नीटनिवडोनी ॥ ८ ॥ कोण्याग्रहाचीकैसीस्थिती ॥ कैसीपूजाकैसीमती ॥
कोणरूपकैसीगती ॥ ऐसेंयथार्थसांगावें ॥ ९ ॥ ऐसेंऐकतांचिउत्तर ॥ पंडित

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(3) श० सरसावलेसमोर ॥ काढोनिपुस्तकांचासंभार ॥ बोलतीतेयथामतीनें ॥ १० ॥ मा०
॥ १ ॥ प्रथमएकपंडितबोलिला ॥ रविग्रहतोअसेभला ॥ जोलागेत्याच्याउपा-
सनेला ॥ त्यासिग्रहपीडानबाधी ॥ ११ ॥ रवितोसूर्यनारायण ॥ जेनरझालेतत्प-
रायण ॥ त्यांचींविघ्नेंहोतीनिरसन ॥ महासामर्थ्यरवीचें ॥ १२ ॥ आधिव्याधि
दरिद्र ॥ स्मरणमात्रेंचिहोतीदूर ॥ मगउपासनाकरीजोनर ॥ चिंतिलेअर्थ
सर्वपुरती ॥ १३ ॥ रवितोमुख्यदैवत ॥ त्यावीणसर्वहीजाणव्यर्थ ॥ नवग्रह
आज्ञापाळित ॥ ऐसाश्रेष्ठग्रहहा ॥ १४ ॥ ऐकतांरवीचीवार्ता ॥ आणित्या
इतरग्रहांचीकथा ॥ तेणेंनिवारेसर्वव्यथा ॥ ऐसेनवग्रहहीसमर्थ ॥ १५ ॥ परी
रविअसेमहाबळी ॥ सर्वांमाजीअतुर्बळी ॥ प्रत्यक्षदिसतोऐत्रकमळीं ॥ तो
हासूर्यनारायण ॥ १६ ॥ तंवदुसरापंडितबोलत ॥ सोमासिअसेबळअद्भुत ॥
तोमाळीअसेह्मणवित ॥ वनस्पतीपोषितसे ॥ १७ ॥ जयाचेंआराध्यदैवत ॥
शिवसांबकैलासनाथ ॥ त्याच्याभाळीहाविलसत ॥ ह्मणोनिश्रेष्ठजाणावा
॥ १८ ॥ चंद्रवर्षेअमृतास ॥ तृप्तकरीसर्वदेवांस ॥ निशिराजमहारूपस ॥ ॥ १ ॥

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

षोडशकळाजयासी ॥ १९ ॥ तोनगांजीचकोणासी ॥ अतिसौख्यदाता
सर्वांसी ॥ सदासर्वदानिर्मळमानसीं ॥ धन्यजयाचेंपूजन ॥ २० ॥ मगतिसरा
पंडितबोलत ॥ ऐकरायासुनिश्चित ॥ मंगळतोमहासमर्थ ॥ कथाऐकतयाची
॥ २१ ॥ मंगळग्रहहामहाक्रूर ॥ जैसीकांतेखड्गाचीधार ॥ तयाचानकळेपार ॥
सर्वग्रहांमाजीवरिष्ठहा ॥ २२ ॥ मंगळग्रहसोनार ॥ क्रूरताजयाचीअति
थोर ॥ परीतोपूजकासिकृपाकर ॥ मंगळकरीसर्वदा ॥ २३ ॥ जेगर्वधरूनि
पूजानकरिती ॥ मगतोखवळेउग्रमूर्ती ॥ विलयाजायसंततिसंपत्ती ॥ शेवटीं
नाशकरीजीवित्वाचा ॥ २४ ॥ तोचिपूजकासिसदाप्रसन्न ॥ सर्वअर्थकरी
पावन ॥ सर्वदुःखनिरसून ॥ अंतर्बाह्यसंरक्षी ॥ २५ ॥ तंवबोलेचवथापंडित ॥
बुधअसेमहाबळवंत ॥ बुधाचाप्रतापअद्भुत ॥ सर्वग्रहांमाजी ॥ २६ ॥ बुध
जातीचाअसेवाणी ॥ नवग्रहांतशिरोमणी ॥ विघ्नेंनासतीतयाच्यापूजनीं ॥
सर्वानंदप्राप्तकरी ॥ २७ ॥ बुधज्यावरीकृपाकरी ॥ लक्ष्मीवंतत्यासीकरी ॥
ऐसातोमहापरोपकारी ॥ बुधग्रहजाणिजे ॥ २८ ॥ बुधग्रहआहेज्यास

" Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(५)

श० नीट ॥ सर्वमार्गसुचतीसुभट ॥ कोणत्याकार्यासहीतूट ॥ तोनकरीकल्पांतीं मा०
॥ २९ ॥ बुधाचीबुद्धिभारी ॥ कोणासीनिष्ठुरतातोनकरी ॥ संसारचिंता
॥ २ ॥ हरी ॥ प्राणिमात्रांची ॥ ३० ॥ मगबोलेपांचवापंडित ॥ गुरुचेंसामर्थ्यअसे
अद्भुत ॥ गुरुतोश्रेष्ठसर्वांत ॥ इंद्रादिदेवांसमस्तां ॥ ३१ ॥ गुरुज्ञानाचानकळे
पार ॥ भाविकासितोकरुणाकर ॥ कर्माकर्मांचाकरीचूर ॥ भवभयव्यथेसी
॥ ३२ ॥ दुःखआणिदारिद्र्यरोग ॥ स्मरणमात्रेंहोयभंग ॥ नवग्रहांतमहा
योग्य ॥ ऐसाजाणिजे ॥ ३३ ॥ गुरुजातीचाअसेब्राह्मण ॥ सर्वांतश्रेष्ठअसे
वर्ण ॥ सर्वदेवकरितीमान्य ॥ गुरुवचनासी ॥ ३४ ॥ गुरुअसेज्ञानाचापुरा ॥
तयाच्यासाम्यासीनसेदुसरा ॥ त्यापुढेंनुरेचिथारा ॥ कल्पनेचाकदाही ॥ ३५ ॥
ह्मणोनिकरितांगुरुसेवा ॥ मगग्रहांचाकोणकेवा ॥ गुरुसर्वभावेंभजावा ॥ तेणें
संतोषसर्वग्रहांसी ॥ ३६ शिवकरीगुरुपूजनासी ॥ तेथेंपाडकायइतरांसी ॥ ऐसा
श्रेष्ठजोसर्वांसी ॥ आगमागम ॥ ३७ ॥ तंवसहावापंडितबोलिला ॥ शुक्रग्रह
असेबहुभला ॥ जेणेंराक्षसांउपकारकेला ॥ संजीवनीमंत्रेंकरोनी ॥ ३८ ॥ शुक्र- ॥ २ ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(५A)

गुरुतोदैत्यांचा ॥ त्रिभुवनींधाकवाहतीजयाचा ॥ पारनकळेसामर्थ्याचा॥ ह्मणो-
निश्रेष्ठतो ॥ ३९ ॥ शुक्राचीशक्तीआहेफार ॥ तोकरीकर्माकर्मांचाचूर ॥ विघ्नेंप-
ळतीदूरच्यादूर ॥ शुक्राचेंनामघेतां ॥४०॥ शुक्रपूजनींजेतत्पर ॥ त्यांच्याशौर्यासि
नाहींपारावार ॥ जोदिव्यदेहीनिरंतर ॥ एकाक्षतो ॥ ४१ ॥ आधिव्याधिदुःख
दरिद्र ॥ स्मरणमात्रेंचहोयदूर ॥ सर्वाभीष्टपरिकर ॥ प्राप्तकरीपूजका ॥ ४२ ॥
नवग्रहांतशिरोमणी ॥ ज्याचामहिमावर्णिलापुराणीं ॥ मान्यताश्रेष्ठसर्वांहूनी ॥
शुक्राचीअसेजाणपां ॥ ४३ ॥ ऐसेंहेसहाग्रहएकोनिराजा ॥ तर्जनीमस्तक
डोलवीवोजा ॥ ह्मणेउत्तमकथिलेंकाजा ॥ अखंडितयांतेंस्मरावें ॥ ४४ ॥
आणिकग्रहराहिलेकोण ॥ सांगापंडितहोनिवडून ॥ कैसींत्यांचींनामेंखूण ॥ त्या
मूर्तीसिबोलिजे ॥ ४५ ॥ मगसंकेंतेंबोलेपंडित ॥ राहुआणिदुसराकेत ॥ हे
उभयतांअतिअद्भुत ॥ दैत्यकुळींचेअसती ॥ ४६ ॥ मातंगजातीचेदोन्ही ॥ दुष्ट
क्रियाह्मणवोनी ॥ त्यांच्यादर्शनेंचंद्रसूर्यगगनीं ॥ चळचळांकांपती ॥ ४७ ॥
राहुपीडीचंद्रासी ॥ केतूतोसूर्यासी ॥ ग्रहणबोलिजेतयासी ॥ प्रत्यक्षदृष्टीसी

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

(5)

श० दिसतसे ॥ ४८ ॥ प्राणिमात्रसर्वजन ॥ त्यांसिनसांडितीपीडेवीण ॥ परीकेलिया मा०
॥ ३ ॥ पूजनस्मरण ॥ किंचितपीडाकरिताती ॥ ४९ ॥ राहूमहापीडकअनिवारमाया ॥
तद्रूपचिकेतुजाणराया ॥ उभयतांचीएकचर्या ॥ पूजनस्मरणेंसंतोषती ॥ ५० ॥
सर्वग्रहांपरीसअतिक्रूर ॥ जनासिपीडाकरितीफार ॥ ह्मणोनिपूजनस्मरणनिरं
तर ॥ राहुकेतूंचेंकरावें ॥ ५१ ॥ तंवनववापंडितबोलत ॥ शनिग्रहश्रेष्ठअवघ्यांत ॥
बलाढ्यहोयअतिअद्भुत ॥ नकळेकळातयाची ॥ ५२ ॥ तोज्यावरीकरीकृपा ॥
त्यासिसर्वमार्गअसेसोपा ॥ ग्रहदिक्पाळांवरछापा ॥ तयाशनिग्रहाचा
॥ ५३ ॥ ज्यावरीतोकोपासचढे ॥ तयावरीनानाविघ्नेंयेतीरोकडें ॥ तयाचा
संसारबिघडे ॥ नराहेकल्पांतीं ॥ ५४ ॥ शनिदेवमहाक्रोधी ॥ ज्याचापराजय
नोहेयुद्धीं ॥ देवदानवांत्रिशुद्धीं ॥ दुःदाताशनिदेव ॥ ५५ ॥ जोकांभावि-
कसज्ञाननर ॥ तोयाग्रंथाचाकरीआदर ॥ पूजनस्मरणनिरंतर ॥ त्यावरीकृपा
करीशनिदेव ॥ ५६ ॥ शनैश्वराचीमूर्तिकाळी ॥ तोजातीचाअसेतेली ॥ चरण
पंगुसुरनचांगली ॥ पूजाकरीकाळभैरवाची ॥ ५७ ॥ त्याचीदृष्टिपडेजयावर ॥ ॥ ३ ॥

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(5A)

करीतयाचाचकनाचूर ॥ अथवाकृपाकरीजयावर ॥ तयासिसर्वआनंदप्राप्तहोय
॥ ५८ ॥ दृष्टीचाऐकाचमत्कार ॥ जन्मलाजेव्हांशनैश्वर ॥ तेव्हांदृष्टीपडली
पितयावर ॥ तेणेंकुष्टभरलासर्वांगीं ॥ ५९ ॥ पित्याच्यारथींहोताजोसारथी ॥ तो
पांगुळझालानिश्चितीं ॥ अश्वांचियानेत्रांप्रती ॥ अंधत्वआलेंतत्क्षणीं ॥ ६० ॥ तेव्हां
त्यांनींउपायकेलेफार ॥ परीगुणनयेचिअणुमात्र ॥ तंवदृष्टिफिरवीशनैश्वर ॥ तंव
तिघेहीआरोग्यजाहले ॥ ६१ ॥ ऐसेंऐकतांराजाविक्रम ॥ हांसूनिबोलेसप्रेम ॥
ह्मणेपुत्रजन्मोनिकायकाम ॥ ऐसाअपवित्रजो ॥ ६२ ॥ तोपुत्रनव्हेकेवळवैरी ॥
जोउपजतांचऐसेंकरी ॥ पुढेंतोकायनकरी ॥ सांगापंडितहो ॥ ६३ ॥ ऐसेंबोलिला
हांसोन ॥ करींटाळींवाजवीगर्जोन ॥ सभेसीविनोदवचन ॥ ह्मणेहापुत्र
कैसाहो ॥ ६४ ॥ ऐसेंबोलतांतेअवसरीं ॥ कैसीवर्तलीनवलपरी ॥ तीऐकावी
आतांचतुरी ॥ चित्तदेऊनियां ॥ ६५ ॥ त्यासमयींशनिदेवविमानीं ॥ जात
होतेबैसोनी ॥ रायाचेंवाक्यऐकतांतत्क्षणीं ॥ विमानखालींउतरलें ॥ ६६ ॥
अकस्मातयेऊनियांसभेंत ॥ बैसलेतेव्हांविमानासहित ॥ तंवपहातेझालेसभा

"Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(6)

श० पंडित ॥ ह्मणतीआलेशनिदेव ॥ ६७ ॥ मगरावउठेझडकरोनी ॥ जाऊनि मा०
नमनकरीचरणीं ॥ तंवटाकिलाझिडकारोनी ॥ शनिदेवानें ॥ ६८ ॥ ह्मणेतूं
॥ ४ ॥ राजाऐसामस्त ॥ टवाळींकरिसीअद्भुत ॥ याचाचमत्कारक्षणांत ॥ दावीनपाहें
आतांचीं ॥ ६९ ॥ तूंफारकरितोसिटवाळी ॥ नसतीचचढविलीकळी ॥ तरी
कन्याराशीसमुळीं ॥ तुजलाग्रहमीआलों ॥ ७० ॥ तरीआतांपाहेंमाझामच
त्कार ॥ तूंनकोकरूंगर्वफार ॥ ऐसेंवदोनिअतिसत्वर ॥ विमानारूढपैंझाला
॥ ७१ ॥ तंवतोरावलागेचरणासी ॥ ह्मणेकृपाकरावीदीनासी ॥ अन्यायघालीं
पोटासीं ॥ कृपाळुवाशनिदेवा ॥ ७२ ॥ तरीतोनमानींचशनिदेव ॥ ह्मणे
मीतुजदाखवीनअनुभव ॥ तव्हांमनींखिन्नजाहलाराव ॥ चिंतामानसींफार
करी ॥ ७३ ॥ मगह्मणतसेपंडितांला ॥ आह्मींमहाग्रहउगाचींछळिला ॥
तोआतांकष्टवीलआह्मांला ॥ तरीकैसेंकरावेंआतां ॥ ७४ ॥ जेंजेंपुढेंहोणार ॥
ह्मणोनिबुद्धिसुचेतदनुसार ॥ तरीजेंअसेललिखिताक्षर ॥ तैसेंआतांहोईल ॥ ४ ॥
॥ ७५ ॥ रावदिलगीरजाहलामानसीं ॥ विसर्जनकरीसभेसी ॥ जाताजाहला

मंदिरासी ॥ कांहींअंतरींसुचेना ॥ ७६ ॥ करूनियांसंध्यास्नान ॥ मग
करीतसेभोजन ॥ तदनंतरकरिताझालाशयन ॥ नावेकपलंगावरी ॥ ७७ ॥
ऐसेंकरितांएकमास ॥ जाहलारायाविक्रमास ॥ मगकायवर्तलेंत्याकथेस ॥
तेंचिआतांऐकिजे ॥ ७८ ॥ रायाविक्रमासिआलाशनी ॥ बारावाअतिक्रुर
स्थानीं ॥ जेणेंत्रासिलेबहुतप्राणी ॥ अभाविकांपीडितसे ॥ ७९ ॥ तेव्हांपंडित
बोलतीवाचे ॥ रायापूजनकरींशनिग्रहाचें ॥ साडेसातवर्षेंनेमाचें ॥ सामर्थ्य
आहेजाणिजे ॥ ८० ॥ तुह्मीविनोदिहांसलांशनीसी ॥ तरीतोकष्टवीलतुह्मांसी ॥
जोकांगांजितोत्रैलोक्यासी ॥ तोचिमहाग्रहजाणिजे ॥ ८१ ॥ चित्तकरो-
नियांएकाग्र ॥ ऐकावापूजेचाप्रकार ॥ जेणेंकरोनिशनैश्वर ॥ कृपाकरीलतुह्मां-
वरी ॥ ८२ ॥ प्रथमकरोनिऔषधीस्नान ॥ मगकरावेंप्रतिमेचेंपूजन ॥
अश्वाचानालघेऊन ॥ त्याचीप्रतिमाकरावी ॥ ८३ ॥ शास्त्रविधीपूजानिर्धार ॥
मगतैलअभिषेककर ॥ मृत्तिकेच्याकुंभावर ॥ त्याचीस्थापनाकरावी ॥ ८४ ॥
स्थापनाझालियाजाण ॥ पूगीफलब्राह्मणासिदेऊन ॥ तेवीससहस्त्रजपसंपूर्ण ॥

यथासांगकरावा ॥ ८५ ॥ जपसंख्याजाहलियावरी ॥ चतुर्थांशहवनकरी ॥
हवनझालियाउपरी ॥ दानेंकरावींशनीच्चीं ॥ ८६ ॥ मगजपकर्त्याब्राह्मणासी ॥
शनैश्वररूपमानूनित्यासी ॥ दक्षिणादेऊनिपूजेसी ॥ प्रसन्नचिकरावें ॥ ८७ ॥
मगकरावेंब्राह्मणभोजन ॥ यथाशक्तिद्यावेंदान ॥ ब्राह्मणतृप्तहोतांपूर्ण ॥ संतोष
पावेशनिदेव ॥ ८८ ॥ जेवींरक्षीबाळकासिमाता ॥ तैसेंरक्षीनिजभक्ता ॥
पंडितह्मणतीरायासमर्था ॥ गोष्टीएवढीएकावी ॥ ८९ ॥ राजाह्मणेपंडितांला ॥
शनिनमानीआम्हांला ॥ तोचिमातापितावहिला ॥ रक्षीतोचिपैंजाण ॥ ९० ॥
मगबोलेविक्रमपंडितांसी ॥ तुह्मीजावेंआपुल्यागृहासी ॥ जेंहोणारअसेलतें
निश्चयेसी ॥ घडूनियेईलनटळेची ॥ ९१ ॥ ऐसेंबोलोनियांउत्तर ॥ कायजाहला
चमत्कार ॥ चित्तकरोनियांस्थिर ॥ श्रवणकरावेंसर्वहीं ॥ ९२ ॥ असोमग
कोणेएकेदिवसीं ॥ दोनप्रहरांच्यासमयासी ॥ कारवानवेपेंउज्जनीसी ॥ घोडे
विकावयाआलाशनिदेव ॥ ९३ ॥ रूपपालटोनिआपुलें ॥ वारूविकावया
आणिले ॥ तंवतेथेंगिन्हाइकपातले ॥ रावहीआलात्यास्थानीं ॥ ९४ ॥ तेव्हां

किंमतपुसतसेरावो ॥ तयासीह्मणेशनिदेवो ॥ वारूफिरवूनिपहाहो ॥ मग
कळेलमोलतयाचें ॥९५॥ तेव्हांसारंगावारूरावआणवीत ॥ चाबुकस्वारासीवरी
बैसवीत ॥ तेणेंघोडाफिरविलाचौगानांत ॥ अतिउत्तमफिरतसे ॥ ९६ ॥ तंव
दुसराघोडाअबलख ॥ त्याचेंमोलरुपयेलक्षएक ॥ तोसोडूनितात्काळिक ॥
आणिलाविक्रमापाशीं ॥ ९७ ॥ तंवत्यासौदागरेंकायकेलें ॥ रायाविक्रमासीच
बैसविलें ॥ घोडाफिरवितांरावबोले ॥ अतिउत्तमफिरतसे ॥ ९८ ॥ तंवत्या
घोड्यासिकोरडामारितां ॥ तेव्हांघोडाउडालागगनपंथा ॥ पवनवेगेंवारूजातां॥
महावनांततेसमयीं॥९९॥अधिककोरडामारितां॥तोंतोंअधिकजायगगनपंथा ॥
थोरअवस्थाहोयचित्ता ॥ केवींवर्तलेंह्मणवोनी ॥ १०० ॥ दूरदेशअतिउजाडी ॥
जेथेंघोरवनमहाझाडी ॥ तेथेंनदीच्यापैलथडी ॥ घोडाजाऊनिउतरला ॥ १ ॥
तेथेंरावउतरलाखालीं ॥ तंवनवलपरीवर्तली ॥ वारूनाहींनदीगुप्तझाली ॥ झाडा
झुडांसहीत ॥ २ ॥ तेव्हांआश्चर्यवाटलेंविक्रमासी ॥ ह्मणेईश्वरीगतिनकळेको
णासी ॥ वारूआणिवनासी ॥ कायविचारपैंजाहला ॥ ३ ॥ तंवअस्तासिपावला

(४)

शु० वासरमणी ॥ अंधकारप्रवर्तलीरजनी ॥ पुढेंमार्गेनदिसेनयनीं ॥ मगतेथेंचि मा०
पहुडला ॥ ४ ॥ चारप्रहरगेलियावरी ॥ उदयासिआलातमारी ॥ मगतोएका
॥ ६ ॥ नगराचामार्गधरी ॥ राजाविक्रमआपण ॥ ५ ॥ तंवतेथोनिचारयोजनें
दुरी ॥ तामलिंदानामनगरी ॥ तेथेंजातांझालातेअवसरी ॥ हळूहळूपोंचला
॥ ६ ॥ इकडेउज्जनीचीकथाराहिली ॥ तीआतांपाहिजेश्रवणकेली ॥
नगरजनांनींवाटपाहिली ॥ चारप्रहररायाची ॥ ७ ॥ तेव्हांसौदागरह्मणेप्रधानासी ॥
वारूद्यावाआमुचाआह्मांसी ॥ कोणीकडेनेलेंबारूसी ॥ रायाविक्रमानें
॥ ८ ॥ तंवपाहतेझालेनगराबाहेर ॥ कोसीदोकोसींकोसचार ॥ परीकोठेंनदिसे
राजेश्वर ॥ मगचिंताप्रवर्तली ॥ ९ ॥ तेव्हांसौदागरह्मणेप्रधानाशी ॥ सत्वर
शोधोनिआणारायासी ॥ नाहींतरीआह्मांसी ॥ पैकाद्यावावारूचा ॥ ११० ॥
तेव्हांप्रधानासिपडलीचिंता ॥ मनींह्मणेकैसेंकरावेंआतां ॥ रायाचाशोधन
ल. गेतत्त्वतां ॥ सोदागरेंअडविलें ॥ ११ ॥ मगप्रधानेंकायकेलें ॥ सौदागरासी
बोल. विलें ॥ ह्मणेवारूचेंमोलकायवहिलें ॥ तेंसांगाआह्मांसी ॥ १२ ॥ तयानें ॥ ६ ॥

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(८ब)

मोलसांगतांचिझडकरी ॥ मगपैकाघातलातयाचेपदरीं ॥ तेव्हांप्रधानासि
पुसोनिसत्वरीं ॥ जाताझालाशनिदेव ॥ १३ ॥ सौदागरगेलियापाठीं ॥ मागें
कायवर्तलीगोष्टी ॥ नगरजनसर्वहोतीकष्टी ॥ देशपट्टणेंधुंडिलीं ॥ १४ ॥ नगरीं
झालीऐसीपरी ॥ इकडेराजाविक्रमकायकरी ॥ तयातामलिंदापूरनगरीं ॥
ग्रामामाजीप्रवेशला ॥ १५ ॥ तंवतेथेंव्यवहारीसावकार ॥ जातीचावैश्य
धनाढ्यथोर ॥ तेव्हांतयाचेदुकानावर ॥ राजानावेंकस्थिरावला ॥ १६ ॥ साव
काराचेदुकानीं ॥ विक्रीहोतसेद्विगुणी ॥ त्याणेंभलामाणूसजाणोनी ॥ आदर
केलातयाचा ॥ १७ ॥ मगव्यवहारीबोलेभावें ॥ तुह्मीआतांमुखमार्जन
करावें ॥ जातीचकोणआहांसांगावें ॥ नामग्रामतुमचेंपैं ॥ १८ ॥ राजाह्मणे
तयावैश्यासी ॥ आम्हींक्षत्रियअसोंपरियेसीं ॥ आमुचामुलूखदूरदेशीं ॥ क्षणएक
येथेंउतरलों ॥ १९ ॥ मगसावकारेंकरविलापाक ॥ अतिउत्तमषड्रसादिक ॥
भातपुन्यासांडगेदेख ॥ करविलेबहुतप्रकार ॥ १२० ॥ मगतोवैश्यम्हणे
क्षत्रिया ॥ उठावेगींजेवावया ॥ भोजनकरोनिलवलाह्यां ॥ मगजावेंसुखरूप

(9)

शा० ॥ २१ ॥ मगरावकरीसंध्यास्नान ॥ सत्वरसारिताझालाभोजन ॥ उत्तमप्रकार- मा०
चेंपक्कान्न ॥ सेवूनितृप्तिपावला ॥ २२ ॥ तेव्हांवैश्यम्हणेक्षत्रियासी ॥ सत्य
॥ ७ ॥ सांगावेंआम्हांसी ॥ मगविक्रमेंयथार्थकथिलेंतयासी ॥ तेव्हांतोनिजअंतरीं
समजला ॥ २३ ॥ आतांत्यासावकाराचीकन्यका ॥ नामतीचेंअलोलिका ॥
तिचापणहाचिदेखा ॥ इच्छिलावरकरावा ॥ २४ ॥ परीतिसीनमिळेइच्छा
वर ॥ वैश्यशोधकरीनिरंतर ॥ तंवहाविक्रमराजापरिकर ॥ म्हणेयासिद्यावी
कुमारिका ॥ २५ ॥ तेव्हांतोबोलेकुमारिकेसी ॥ बाईउत्तमवरआणिला
तुजसी ॥ आतांतूंमाळघालीयासी ॥ नकरींअनुमान ॥ २६ ॥ हास्वरूपेंआहे
सुंदर ॥ बत्तीसलक्षणीपरिकर ॥ हाभाग्यवंतजाणवर ॥ यासीवरीकुमारिके
॥ २७ ॥ तेंव्हांकुमारीबोलेपित्यासी ॥ तुम्हीबहुतवर्णितांयासी ॥ परीनभरतां
ममानसीं ॥ नवरोत्यासीनिर्धारीं ॥ २८ ॥ आजपाहीनयाचेंलक्षण ॥
कैसेंचातुर्यकायज्ञान ॥ भाषणावरूनिप्रमाण ॥ सर्वकळोंयेईल ॥ २९ ॥
ऐसेंवदतांजाहलीसांज ॥ तंवअस्तासिगेलाभानुराज ॥ पित्यासिम्हणे ॥ ७ ॥

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. Joint project

(9A)

महाराज ॥ पांथिकासीपाठवावें ॥ १३० ॥ मगवैश्यब्राह्मणेक्षत्रियासी ॥
जावेंनिद्राकरावयासी ॥ अतिरम्यचित्रशाळेसी ॥ तेथेंसर्वविदीतहोईल
॥ ३१ ॥ मगतोविक्रमउठोनिचालिला ॥ जेथेंहोतीचित्रशाळा ॥ तेथेंहंस
मयूरकोकिळा ॥ नानाप्रकारचेलेपिले ॥ ३२ ॥ चित्रेंरेखिलींबहुकुश
ळता ॥ वारूआणिगजरथा ॥ चित्रकारेंचित्ररेखितां ॥ आळसकांहींनकेला
॥ ३३ ॥ पुढेंपाहेराजानयनीं ॥ तंवअपूर्वमंचकदेखिलातत्क्षणीं ॥ त्यावर
पासोडालेपदोन्हीं ॥ आंथरूणघातलेंसे ॥ ३४ ॥ रत्नखचितसुरंगपलंग ॥
त्यावरीनानापरीचेरंग ॥ जाईजुईपुष्पसुरंग ॥ शेजकेलीअतिनिगुतीं ॥ ३५ ॥
वरतीलोंबतीमोतियांचेघड ॥ चांदवाकरीतसेफडफड ॥ समयाजळतीघड
घड ॥ चतुष्कोणींचारपैं ॥ ३६ ॥ ऐसेंपाहूनिरावझालाचकित ॥
ह्मणेनकळेकायआहेवृत्तांत ॥ हाकोणदेशकोणतीगत ॥ होईलतीकळेना
॥ ३७ ॥ कर्माच्यागतिअसतीगहना ॥ जेंजेंहोणारतेंकदाचुकेना ॥ तेंतें
भोगिल्यावीणसुटेना ॥ देवादिकांसर्वांसी ॥ ३८ ॥ तरीहेंशनिदेवाचेंछळण ॥

Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(१०)

श० त्याणेंहीरचिलीमायाजाण ॥ आतांहोणारतेंहोयआपण ॥ जोसर्वांसीपीडितसे मा०
॥ ३९ ॥ ऐसामनींकरोनिविचार ॥ मगनिद्राकरीराजेश्वर ॥ तयापलंगीं
॥८॥ साचार ॥ सावधाननिजेअंतरीं ॥ ४० ॥ नानापरीचेकरीविचार ॥ बुद्धीचे
तरंगअपार ॥ म्हणोनिनिद्रानयेसाचार ॥ परीमुखआच्छादनकेलेंसे ॥ ४१ ॥
रायेंकेलीऐशीपरी ॥ मगवैश्यकन्यकाकायकरी ॥ पंचारतीघेऊनिकरीं ॥ आली
रंगमहालाकारणें ॥ ४२ ॥ तिणेंकेलासर्वशृंगार ॥ गळांशोभतिमोतियांचे
हार ॥ केशरकस्तूरीकर्पूर ॥ सुगंधद्रव्यें आणिलीपैं ॥ ४३ ॥ पायींपैंजण
नूपुरें ॥ तींझणत्कारकरितीगजरें ॥ पदकासिजडिलेदिव्यहिरे ॥ त्यांचेंतेज
फांकतसे ॥ ४४ ॥ तीजैसीपुतळीचकेवळ ॥ बत्तीसलक्षणींवेल्हाळ ॥ मृगनयना
भाळविशाळ ॥ येऊनिउभीठाकली ॥ ४५ ॥ रावनिद्रेंचेंमिषकरून ॥ पलंगीं
पहुडलासेजाण ॥ तोनउठेऐसेंजाणोन ॥ मगकुमारीकायकरी ॥ ४६ ॥ चंदन
पात्रघेऊनिहातीं ॥ अलोलिकाहोयसिपिती ॥ तरीजागानहोयनृपती ॥ कोणें
हीप्रकारेंकरोनी ॥ ४७ ॥ ऐसीएकप्रहरझालीकष्टी ॥ जागानहोयमगझाली ॥८॥

Shri Dharmodhar Mandal, Dhule and Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com